वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. २९ सप्टैंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# अहमदनगरमध्ये तणावाचे वातावरण, रांगोळी काढून मुस्लिम धर्मियांची भावना दुखावली

## झालेल्या प्रकरणाचा निषेध करणाऱ्या मुस्लिमांवरच पोलिसांचा लाठीचार्ज

### मागील काही दिवसापासून अहमदनगर हे अशांततेचे केंद्र बनले

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता





अहमदनगर, (दिव्य न्युज):- मुस्लीम धर्मगुरुच्या नावाची रांगोळी काढून त्याचे विटंबना करण्याता आल्याच्या प्रकारावरून अहमदनगरमध्ये तणाव निर्माण झाला. विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी आंदोलक रस्त्यावर आले. छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्गावर रास्ता रोको केला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. सोमवारी सकाळी रास्ता रोको आणि लाठीचार्जची घटना घडली.

अहमदनगर शहरातील माळीवाडा भागातील बारातोटी कारंजा येथे धर्मगुरुंबद्दल रस्त्यावर रांगोळी काढून आक्षेपार्ह कृती केल्याप्रकरणी दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला होता. अहमदनगर, औरंगाबाद रोडवरील कोटला गावात एका मुस्लिम धर्मगुरूंच्या नावाच्या विटंबनेची गंभीर घटना समोर आली आहे. अज्ञातांनी रोडवर मुस्लिम धर्मगुरूंचे नाव लिहून विटंबना केली, ज्यामुळे मुस्लिम समाजात तीव्र संताप व्यक्त झाला. या घटनेच्या निषेधार्थ मुस्लिम समाजाने नगर-संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू ▶▶ पान २ वर

## या घटनांमागे कोण, हे शोधून कारवाई करू

### नगरमधील तणावाबाबत मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया



यवतमाळ, (वृत्तसेवा):- धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करत अहिल्यानगर येथे आज सोमवारी (ता. २९ सप्टेंबर) सकाळी मुस्लीम धर्मियांनी रास्ता रोको केला होता. मुस्लीम धर्मगुरुच्या नावाची रांगोळी काढून त्याचे विटंबना करण्याता आल्याचा आरोप यावेळी मुस्लीम धर्मियांनी केला. या प्रकरणी घटनेच्या काही तासांमध्येच पोलिसांनी एकाला अटक केली. पण तरी सुद्धा या घटनेविरोधात छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्गावर रास्ता रोको केला. त्यामुळे या ठिकाणच्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी जोरदार लाठीचार्ज केला. त्यामुळे या प्रकारानंतर या ठिकाणी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. पण आता या प्रकरणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

यवतमाळ येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना अहिल्यानगर येथे झालेल्या तणावाबाबत विचारणा करण्यात आली. तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, मी कार्यक्रमात, प्रवासात ▶▶ पान २ वर

## ताशी ११३ किमी प्रति तास वेगानं धडकणार महाभयंकर संकट

### हवामान विभागाचा हाय अलर्ट

मुंबई, (दिव्य न्युज):- व्हिएतनाम आता आणखी एका मोठ्या संकटाच्या उंबरठ्यावर उभं आहे. व्हिएतनामला सर्वात मोठं आणि धोकादायक वादळ धडकण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाचा वेग ताशी ११३ किमी एवढा प्रचंड आहे. बुआलोई नावाचं हे चक्रीवादळ सध्या वेगानं व्हिएतनामकडे सरकत आहे. हे वादळ व्हिएतनामला धडकणार आहे, या सर्व पार्श्वभूमीवर १५ हजारांहून अधिक लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. व्हिएतनाम ▶▶ पान २ वर

## कोल्हापुरात 'एमआयएम' पक्ष कार्यालयाचा वाद पेटला

### ओवेसी अन् इम्तियाज जलील यांना हॉटेलबाहेर पडणंही झालं मुश्किल



कोल्हापुर, (दिव्य न्युज):- कोल्हापूर जिल्ह्यात मागील तीन वेळा एमआयएमचे खासदार आणि नेते असदूद्दीन ओवेसी यांना कोल्हापुरात विरोध झाला होता. मात्र सोमवारी (ता.२९) पक्षाच्या सभेसाठी आणि कोल्हापुरात पक्षकार्यालयाच्या उद्घाटनासाठी आलेल्या खासदार असदुद्दीन ओवैसी (-ीरर्वीववळप जुरळीळ) यांना पुन्हा एकदा कोल्हापूरकरांच्या रोषाला सामोरे जावे लागले. कोल्हापुरात या पक्षाचे कार्यालय नको हीच भूमिका हिंदुत्वादी कार्यकर्ते आणि कोल्हापूरकरांनी घेत त्यांना हॉटेलबाहेरही देखील पडू दिले नाही.

कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी कोल्हापूर पोलिसांकडूनच खबरदारी घेत पक्ष कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी बागल चौक येथे जाण्यासाठी मनाई करण्यात आली. अखेर दुपारी एक वाजता आलेल्या खासदार ओवैसी आणि माजी खासदार इम्तियाज ▶▶ पान २ वर

## शरीफ कॉलनीत बदमाशाला बेड्या

### विकायचा नशेच्या गोळ्या, पोलिसांनी काढली धिंड



औरंगाबाद , (दिव्य न्युज):- किराडपुरा येथील एक तरूण नशेच्या गोळ्या विक्री करणाऱ्याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. ही कारवाई शुक्रवारी (ता. २६) किराडपुरा भागातील मैदानावर करण्यात आली. सय्यद अरबाज सय्यद इस्माईल (२९, रा. शरीफ कॉलनी) असे त्याचे नाव आहे. आरोपी सय्यदच्या ताब्यातून नशेच्या ९० गोळ्या, दुचाकी आणि रोकड असा दोन हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिन्सी पोलिसांना एक संशयित दुचाकीवर (एमएच-२०, एचके-०३१२) फिरून नशेच्या (बटण) गोळ्यांची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत यांच्यासह उपनिरीक्षक प्रताप साळवे, अंमलदार जफर, चव्हाण, शंकपाळ, भीमा पवार यांच्या पथकाने सय्यदला पकडले. त्याची अंगझडती घेत दुचाकीची डिक्की तपासली असता, ९० बटण गोळ्या, २१०० रुपये रोख व मोबाइल असा मुद्देमाल सापडला.पोलिसांनी आरोपी सय्यदला अटक करून न्यायालयात हजर केले असता, त्याला तीन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. न्यायालयातून बाहेर पडल्यानंतर पोलिसांनी नशेच्या गोळ्या कुठून आणल्या, याबाबत त्याची चौकशी केली. त्यानंतर रविवारी (ता. २८) ज्या भागात तो नशेच्या गोळ्या विकत फिरत होता, त्याच किराडपुरा भागात त्याची धिंड काढली.तरुणाई नशेच्या गर्तेत अडकत आहे. ही चिंतेची बाब असून यावर पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येत आहे. आजवर अशा अनेक धिंडी काढल्या आहेत. एनडीपीएस सेल आणि सर्वच ठाणेदारांकडून नशेच्या गोळ्या विक्री करणाऱ्यांची धिंड काढली जात आहे.




## ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या आव्हानानुसार स्वयंसफूतपणे बंद

### देशात ३ ऑक्टोंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत व्यवसाय बंदचे आवाहन

बीड, (दिव्य न्युज):- ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या अहवानानुसार दि.३ ऑक्टोंबर २०२५ शुक्रवार रोजी संपूर्ण देशात सकाळी ८ वाजल्यापासून ते दुपारी २ वाजे पर्यंत मुस्लिम समाजाने आप आपले व्यवसाय, सेवा आणि दुकाने स्वयंस्फूतपणे बंद ठेवावे असे आवाहन मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाकडून करण्यात आले आहे. या करीता आज बीड येथील बोर्डाच्या कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जमियत उलेमा ए हिंदचे मराठवाडा उपाध्यक्ष मौलाना जाकेर सिद्दीकी, मौलाना बाखी साहेब, शफिक ▶▶ पान २ वर




## यश ढाका हत्या प्रकरण : व्हिडिओ व्हायरल

# आणखी एक काटे गजाआड

### आरोपींची गय केली जाणार नाही-एसपी नवनीत काँवत

बीड (दिव्य न्युज):- येथील सायं.दै.सिटीझनचे उपसंपादक देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका याची अतिशय निर्दयीपणे हत्या करण्यात आली. सदरील हत्या प्रकरणात सुरज काटे त्याच दिवशी पोलीसांच्या ताब्यात आला होता. या प्रकरणात काल रात्री पाडळसिंगी (ता.गेवराई) येथील उड्डाणपुलाखालून सोमनाथ भाऊसाहेब काटे (वय १८ रा.इरगाव ता.गेवराई) याला पोलीसांनी पकडले. त्याला आज दुपारनंतर न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. दरम्यान यश ढाका याच्या हत्येचा व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल झाल्याने पोलीस प्रशासनाच्या इज्जतीची लक्तरे वेशीला टांगली गेली आहेत. बीडमध्ये अशा प्रकारे वर्दळीच्या ठिकाणी सर्रास चाकू हातात घेऊन हत्या केली जात असेल तर कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही ? असा प्रश्न प्रत्येकजण करू लागला आहे. हा व्हिडीओ केवळ जिल्ह्यापुरताच मर्यादित राहिला नसून राज्यभर या व्हिडीओने खळबळ उडवली आहे.

यश ढाका याच्या हत्येचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलीस आता त्यामध्ये दिसणाऱ्या एका-एकाची माहिती ▶▶ पान २ वर




### बीडमध्ये वाल्मिकी समाजाच्या तरुणाची निर्घृण हत्या,ऑल इंडिया पँथर सेनेकडून तीव्र निषेध

## प्रकरण फास्ट्रॅक कोर्टात चालवा



बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात गुरुवारी रात्री २२ वर्षीय यश देवेंद्र ढाका या वाल्मिकी समाजाच्या तरुणाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आली. स्थानिक पत्रकार देवेंद्र ढाका यांचा हा मुलगा असून, अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारा यश मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीत किरकोळ वादातून या भयानक घटनेचा शिकार झाला. कुटुंबाने हा सुनियोजित पान २ वर

# दिव्य वार्ताची तक्रार, मुख्याधिकारी फडसे थेट जन्म-मृत्यू विभागात



बीड, (दिव्य न्युज):- नगर परिषदेच्या जन्म-मृत्यू विभागातील कामकाजावर नेहमीच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. नागरिकांची कामे वेळेत व पारदर्शकपणे व्हावीत यासाठी काही दिवसांपूर्वी मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांनी विभागात संगणकांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला. आधी पाच संगणकांवर काम होत असताना आता ते सात करण्यात आले आहे. मात्र एवढ्या उपाययोजनांनंतरही भ्रष्टाचार व एजंट राज यामध्ये काहीही फरक पडलेला नाही. फोटोमध्ये दिसत आहे की सामान्य नागरिक दिवस भर रांगेत उभे आहेत. कष्टकरी लोकांना आपली कामे करून घेण्यासाठी तासन् तास वाट पाहावी लागत आहे. तर दुसरीकडे लिपिक कुलकर्णी यांच्या अंधारकारभारामुळे एजंटांना मात्र थेट कॅबिनमध्ये प्रवेश दिला जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या कामांमध्ये जाणीवपूर्वक विलंब होत असल्याची चर्चा रंगली आहे. लोकांना छोट्या छोट्या दुरुस्ती व अर्जाच्या नावाखाली जादा पैसे मोजायला भाग पाडले जात आहे. एजंटांकडूनच अर्ज घ्यावे लागतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दहा रुपयांचा अर्ज ३० ते ४० रुपयांना विकला जातो, अशी माहिती नागरिकांकडून समोर आली आहे. परिणामी सामान्य नागरिकांचा त्रास वाढला असून नगर परिषदेवरील विशास डळमळीत होत आहे. जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांसारख्या मूलभूत सेवेसाठी एवढा त्रास सहन करावा लागत आहे हे दुर्दैवीच आहे. प्रशासनाकडून तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा नागरिकांचा आक्रोश रस्त्यावर उमटल्याशिवाय राहणार नाही, अशी चर्चा शहरात सुरु झाली आहे. नगर परिषदेतील मुख्याधिकारींनी संगणकांची संख्या वाढवली असली तरी तोच जुना अंधेरनगरी कारभार सुरू आहे. लिपिक आणि एजंट यांच्या संगनमतामुळे सामान्य लोकांचे हक्काचे काम पैशाशिवाय होत नसल्याची नागरिकांची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# नगर परिषदेच्या जन्म-मृत्यू विभागात एजंट राज कायम, सामान्य नागरिकांना रांगेत ठेऊन लिपिकांची दलाली सुरूच




पान १ वरून

## महावितरण चा

ती कारवाई करावी नसता आंदोलन चढण्यात येईल असं बालनाईक तांडा ग्रामस्थ म्हणत आहे.मागील काही मीटर थकीत राहिल्यामुळे मीटर तोडून घेऊन गेले होते तेच आम्ही चालू वर्षी ते पूर्णपणे निल करून रेगुलर मध्ये सुरू केले आहेत. तरीही आज पर्यंत मीटर दिले नाहीत देतो म्हणाले होते त्यांना मीटरची मागणी केली असता करू फिट देता येईल कुठे चालले तुम्ही असं म्हणत मग आम्ही काय करायचं या सर्व गोष्टीला कंटाळून बालनाईक तांडा ग्रामस्थ येत्या २ तारखे पर्यंत लाईट नाही आली तर आम्ही ग्रामस्थ उपोषणाला बसणार आहे. अस प्रसिद्धी माध्यमाशी बोलताना ग्रामस्थांनी म्हटले आहे.

## ७९ वर्षांपासून

विक्रीसाठी, बाजारहाट, दवाखाना, तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. पालक दररोज आपल्या लेकरांच्या जीवावर उदार होऊन शाळेत पाठवतात.रस्त्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी विष्णु बांगर, मल्हारी आरगुडे, रामेश्वर शिंदे, छत्रभुज रांजवण, राजेभाऊ कदम, जगन्नाथ बोबडे, कृष्णा जगदाळे, श्रीहरी आरगुडे, दिलीप जाधव, यश बांगर आदी ग्रामस्थांनी केली आहे.

लवकरच रास्ता रोको आंदोलन

अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गापासून फक्त ७ किमी अंतरावर असूनही रस्त्याच्या अभावामुळे ९०० लोकसंख्या असलेल्या गावाला दरवर्षी संकटांना सामोरे जावे लागते. १ ते ४ वीपर्यंत शाळा गावात आहे, मात्र पुढील शिक्षणासाठी वाघिरा, लिंबागणेश, भायाळा येथे जाण्यासाठी रस्ताच नाही. त्यामुळे पालक व विद्यार्थी अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत.

लवकरच राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन उभारले जाईल, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला..

## महाविकास आघाडीचा

यावा,पिक विमा तात्काळ देण्यात यावा.यासह अनेक मागण्यासाठी महाविकास आघाडीचा शेतकरी अक्रोश बैलगाडी मोर्चा सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष महादेव जमाले, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी केले आहे.तहसील कार्यालयासमोर शेतकरी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करून शासनाला जागे करणार आहेत.

## शेतकऱ्यांना हेक्टरी

आदमी पार्टीच्या वतीने रुमनं मोर्चा काढून मा. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत या मागण्यांचे निवेदन देण्यात आले की १. महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा. २. शेतकऱ्यांना हेक्टरी ५०,००० आर्थिक मदत तात्काळ जाहीर करण्यात यावी. ३. सर्व पीककर्ज/शेतीकर्ज माफ करून सातबारा कोरा करण्यात यावा. ४. नुकसानग्रस्त भागांमध्ये तात्काळ, पारदर्शक व निष्पक्ष पंचनामे करून मदतीचे वाटप करण्यात यावे. ५. पंचनाम्याची प्रक्रिया गतीने व न्याय्य पद्धतीने पार पाडावी. ६. पुढील हंगामासाठी मोफत बियाणे व खतांची उपलब्धता करून द्यावी. पंजाबमध्ये आम आदमी पार्टी सरकारने अशाच परिस्थितीत हेक्टरी ५०,००० मदत जाहीर केली होती. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनाही तत्काळ तीच मदत मिळावी, हीच आमची प्रमुख मागणी आहे. आपण या निवेदनाची गांभीर्याने दखल घ्यावी आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, ही नम्र विनंती. रूमनं मोर्चात सहभागी मान्यवर नेते: अशोक येडे - जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी कॉम्रेड डीजी तांदळे जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र किसान सभा बीड, गणेश नाईकवाडे जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघ, दत्तात्रय व्यंकटी सविंदरमल महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष जिल्हा उपाध्यक्ष बीड, नितीन जायभाय बीड शहर बचाव मंच, प्राध्यापक ज्ञानेश्वर राऊत जिल्हा संघटन मंत्री, सय्यद सादेक - शहराध्यक्ष कृष्णा जगताप - तालुकाध्यक्ष अजून खान - तालुका उपाध्यक्ष रफिक पठाण - जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे - जिल्हा सचिव बाळासाहेब मोरे पाटील - संस्थापक अध्यक्ष, शिवशक्ती-भीमशक्ती मिलिंद पाळणे - शहर सचिव कैलास चंद्र पालिवाल - कोषाध्यक्ष, आम आदमी पार्टी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष इत्यादी मोठ्या संख्येने कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते

पान १ वरून

## या घटनांमागे कोण,

असल्यामुळे या प्रकाराची संपूर्ण माहिती माझ्याकडे आलेली नाही. केवळ प्राथमिक माहिती माझ्याकडे आहे. संपूर्ण माहिती घेतल्यानंतरच मी यावर बोलेन. अलीकडच्या काळातमध्ये काहीतरी प्रयत्न होत आहे की, महाराष्ट्रामध्ये काही बोर्ड लावायचे किंवा काही तरी करायचे. येथील सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्यामागे नेमके कोण आहे, हेदेखील आपल्याला शोधावे लागेल. ते नक्की आम्ही शोधू आणि त्यावर कारवाई करू, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर शहरातील माळीवाडा भागातील बारातोटी कारंजा येथे धर्मगुरुंबद्दल रस्त्यावर रांगोळी काढून आक्षेपार्ह कृती केल्याप्रकरणी दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला होता. याचे पडसाद सोमवारी उमटले. विटंबना करणाऱ्या संबंधिताविरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर -छत्रपती संभाजीनगर रोडवरील कोठला भागात कार्यकर्त्यांनी रस्त्यावरच ठिय्या दिला. संबंधित तरुणाला ताब्यात घेतले आहे. त्यामुळे आंदोलकांनी आता आंदोलन करण्याची गरज नाही, असे पोलीस समजून सांगत होते. तरुण काही ऐकत नव्हते. दरम्यान छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. वाहतुकीत अडथळा येऊ नये म्हणून पोलीस वारंवार विनंती करत होते. मात्र आंदोलक ते मानायला तयार नसल्याने पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यामुळे काही वेळ गोंधळ आणि तणावाची परिस्थिती निर्माण झाली.

## अहमदनगरमध्ये

केले. कोटला परिसरात मुस्लिम तरुण आक्रमक झाल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सतर्क आहेत. सुमारे एक तासाहून अधिक काळ हे आंदोलन सुरू होते, ज्यामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असून, या प्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेतल्याचे बोलले जात आहे. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

पोलिसांनी आंदोलकांना समजावले, पण...

सोमवारी याचे पडसाद उमटले. विटंबना करणाऱ्या संबंधिताविरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीसाठी अहमदनगर-औरंगाबाद रोडवरील कोठला भागात कार्यकर्त्यांनी रस्त्यावरच ठिय्या दिला. मात्र संबंधित तरुणाला ताब्यात घेतले आहे. त्यामुळे आंदोलकांनी आता आंदोलन करण्याची गरज नाही, असे पोलीस समजून सांगत होते.

तरुण काही ऐकत नव्हते. दरम्यान औरंगाबाद-अहमदनगर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. वाहतुकीत अडथळा येऊ नये म्हणून पोलीस वारंवार विनंती करत होते. मात्र आंदोलक ते मानायला तयार नसल्याने पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यामुळे काही वेळ गोंधळ आणि तणावाची परिस्थिती निर्माण झाली.

३० ते ३५ जणांना पोलिसांनी घेतले ताब्यात

दरम्यान, हा तणाव आता शांत झाला असून पोलिसांनी संबंधित युवकाला व आंदोलन करणाऱ्यांना अटक करण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांनी सांगितले की, जमावाला पांगवण्यासाठी हा लाठी चार्ज करण्यात आला. याप्रकरणी ३० ते ३५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## ऑल इंडिया

हाशमी साहेब, मौलाना शकील, मौलाना मुजम्मील, मौलाना इलियास, मौलाना अब्दुल रहिम कासमी, मुफ्ती गयास साहेब, मुफ्ती अन्वर साहेब यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मौलाना रहिम कासमी म्हणाले की, देशभरात आय लव्ह मोहंमद असे बॅनर लावणाऱ्यां लोकांविरूध्द देशभरात तीन हजार पेक्षा अधिक एफआयआर नोंदविण्यात आलेल्या आहेत. याचा मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड जाहिर निषेध करते तसेच वक्फ कायदा २०२५ रद्द करण्याची आमची मागणी आहे. कायद्यातील दुरूस्त्यांना सर्वोच्च न्यायालयात अहवान देण्यात आले आहे आणि आमच्या मुलभूत अधिकारांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने हा कायदा मागे घ्यावा अशीही मागणी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डने सरकारकडे केली आहे. या करीता दि.३ ऑक्टोंबर २०२५ शुक्रवार रोजी बीड जिल्ह्यातील स्वयंस्फूतपणे सर्व व्यवसाय, सेवा आणि दुकाने मुस्लिम समाजाकडून बंद करण्यात येतील हा बंद पुर्णपणे शांततामय आणि लोकशाही मार्गाने होईल असेही वक्फ बचाव कमिटी, मजलीए ए उलेमा बीड व बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कोल्हापुरात 'एमआयएम'

जलील यांना सायंकाळपर्यंत हॉटेलमध्येच बसावे लागले.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज इचलकरंजीत एमआयएमच्या कार्यकर्त्यांचा मेळावा होणार आहे. या मेळाव्यासाठी खासदार असदुद्दीन ओवीसी आणि माजी खासदार इम्तियाज जलील (खीींळरू गरश्रळश्र) आले आहेत. कोल्हापुरातील बागल चौक येथे पक्ष कार्यालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते पार पडणार होते. मात्र, कोल्हापूर वासीय आणि हिंदुत्ववादी कार्यालयाला सुरुवातीपासूनच विरोध दर्शवला.

सकाळपासूनच बागल चौक येथे हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी जमायला सुरुवात केली होती. यावेळी प्रचंड घोषणाबाजी दोन्ही गटांकडून सुरू होते. मात्र योग्य खबरदारी घेत कोल्हापूर पोलिसांनी देखील तितकाच तगडा बंदोबस्त बागल चौक येथे लावला होता.बागल चौक येथील वातावरण तणावपूर्ण बनत असल्याने खासदार ओवीसी आणि इम्तियाज जलील यांना या ठिकाणी येण्यास पोलिसांनी मज्जाव केला. त्यामुळे एक वाजल्यापासून दोघेही हॉटेलमध्येच थांबून होते. हॉटेल बाहेर देखील कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

तसेच ओबीसी याच्या समर्थनार्थ घोषणाबाजी सुरू होती. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास ओवैसी यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. मात्र, ती देखील काही कारणास्तव रद्द करण्यात आली. त्याऐवजी माजी खासदार इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषद घेतली.दुपारी एक वाजण्याच्या सुमारास खासदार ओवैसी आणि इम्तियाज जलील कोल्हापुरात दाखल झाले होते. मध्यवर्ती बसस्थानक परिसरात एका हॉटेलमध्ये त्यांची व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळी सात वाजता इचलकरंजीमध्ये त्यांची सभा होणार आहे. या सभेच्या पार्श्वभूमीवर साडेसहा वाजता दोघेही हॉटेलमधून बाहेर पडले.

## ताशी ११३ किमी

सरकारने देशभरात हाय अलर्ट जारी केला असून, नागरिकांना सतर्कतेचं आवाहन करण्यात आलं आहे. व्हिएतनामच्या हवामान विभागाकडून देखील धोक्याचा इशारा देण्यात आला आहे.

हे तेच चक्रीवादळ आहे, ज्या चक्रीवादळाने फिलिपिन्समध्ये मोठा धुमाकूळ घातला होता. या चक्रीवादळामुळे फिलिपिन्समध्ये दहा लोकांचा मृत्यू झाला होता तर देशाच्या अनेक भागांमध्ये महापूर आला होता. आता हे चक्रीवादळ प्रचंड वेगानं व्हिएतनामकडे सरकलं असून, याचा वेग दुप्पट बनला आहे. ११३ किमी प्रति तास वेगानं हे वादळ व्हिएतनामला एक ऑक्टोबर रोजी धडकण्याची शक्यता आहे. या काळात देशात ६०० मिमी इतका प्रचंड पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. प्रचंड पावसामुळे नद्यांना महापूर येणार आहे.

बुआलोई चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर देशात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे, आतापर्यंत ज्या भागांमध्ये सर्वाधिक धोका आहे, अशा भागातील १५,००० पेक्षा जास्त लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आलं आहे. ज्या भागात हे चक्रीवादळ धडकणार आहे, त्या भागांमध्ये खबरदारी म्हणून हजारो सैनिक तैनात करण्यात आले आहेत. हे चक्रीवादळ येत्या एक ऑक्टोबरला व्हिएतनामला धडकण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या घराचं जास्त नुकसान होऊ नये यासाठी तेथील लोक आपल्या घराच्या छतांची दुरूस्ती करत आहेत. दोन दिवसांनंतर या चक्रीवादळाचा मोठा तडाखा व्हिएतनामला बसणार आहे, त्यामुळे मच्छिमारांनी समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये असे आदेश तेथील सरकारने दिले आहेत.

या चक्रीवादळामुळे व्हिएतनामचं प्रचंड नुकसान होण्याची शक्यता आहे, हे चक्रीवादळ तब्बल ताशी ११३ किमी प्रति तास वेगानं व्हिएतनामला धडकण्याची शक्यता आहे. देशावर अतिमुसळधार पाऊस, वादळ आणि महापूर असे तिहेरी संकट एकाचवेळ निर्माण झालं आहे.

## प्रकरण फास्ट्रॅक

कट असल्याचे सांगितले असून, सात ते आठ आरोपी असल्याची शक्यता व्यक्त केली आहे. ऑल इंडिया पँथर सेनेने या हत्येला जाहीर निषेध करत कठोर तपास, फास्ट ट्रॅक कोर्ट आणि आरोपींना फाशी देण्याची मागणी केली आहे.यशच्या हत्येनंतर रविवारी राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार यांनी पीडित कुटुंबाला भेट देऊन सांत्वन केले. कुटुंबीयांनी दीपक भाईंना घटनेची माहिती देताना, हा सुनियोजित कट होता. यात अनेक आरोपींचा समावेश आहे. सर्वांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी केली. यशच्या वडिलांनी सांगितले की, मुलाची हत्या किरकोळ वादाच्या नावाखाली केली असली तरी मागे लपलेल्या षड्यंत्राचा तपास व्हायला हवा. कुटुंब सध्या भीतीच्या सावटाखाली असून, पोलिसांनी तात्काळ संरक्षण द्यावे, असेही त्यांनी आवाहन केले.पँथर सेनेच्या या भेटीत अनिल उजगरे, सुंदर वाघमारे, समाधान बचुटे, वसीम शेख, अमोल गढवे, अविनाश वडमारे, पप्पू आरे, राजेश वडमारे, बाबा कांबळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सेनेने सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई, सीआयडी-एसआयटीमार्फत चौकशी आणि फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवण्याची मागणी केली आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत लढा चालू राहील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. या घटनेमुळे बीड शहरात खळबळ उडाली असून, वाल्मिकी समाजातून रोष व्यक्त होत आहे. शुक्रवारी शोकाकुल वातावरणात यशचे अंत्यसंस्कार झाले. पोलिसांनी तपास वेगवान केल्यासच या प्रकरणाचा खरा चेहरा उघड होईल, असा विशास आहे.

## आणखी एक

काढू लागली आहे. आत्तापर्यंत केवळ एकच आरोपी आहे असे सांगणाऱ्या पोलीसांना या व्हायरल व्हिडीओने आरसा दाखवला आहे. जे काम पोलीसांनी करायला पाहिजे होते ते काम व्हायरल व्हिडीओने केल्याचे दिसुन येते. घटना घडली त्याच दिवशी पोलीसांनी सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले असते तर इतर आरोपी त्याच दिवशी निष्पन्न होऊन त्यांना गजाआड करता आले असते. मात्र पोलीसांनी हत्या प्रकरणाशी संबंधित तपास न करता एफआयआर दाखल करून घेण्याचीच गडबड केली. त्यानंतरही दोन दिवस पोलीसांनी या प्रकरणात काहीच केले नाही. मात्र हत्येचा व्हिडीओ व्हायरल होताच जो तो पोलीसांनी दोष देऊ लागला. तेथून पुढे यंत्रणा हलली आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पीएसआय खटावकर, अशोक दुबाले, गायकवाड, आगलावे यांनी पाडळसिंगी येथील उड्डाणपुलाच्या खालून सोमनाथ भाऊसाहेब काटे याला पकडले. यामध्ये आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे. व्हिडीओमध्ये घटनास्थळी जे कोणी दिसत आहेत. त्या सर्वांची चौकशी करण्यात येणार असल्याचे पोलीसांनी सांगितले.

जबाबाचे काय झाले?

पोलिसांनी मयत यश ढाका याच्यासमवेत असलेल्या कंडेरे याचा जबाब नोंदवून घेतलेला आहे. त्याने जबाबामध्ये तिघांची नावे घेतलेली आहे.परंतू ते अजुनही रेकॉर्डवर आले नसल्याचे सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षदर्शीने जबाब देवूनही त्या तिघांनाही पोलिसांनी अटक का केली नाही ? असा देखील प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. या संदर्भात पोलिसांकडे विचारणा केली असता ही नावे तपासात असतात त्या तिघांचेही व्हेरिफिकेशन करून त्यांना अटक करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.-